कार्यारंभ आदेश

नाला खोलीकरण त्रिभूवनवाडी
ता पाथर्डी जि अहमदनगर

अहमदनगर जिल्हा परिषद
लघुपाटबंधारे विभाग
जि प आदेश क्र.कार्या-२/लेखा.४/निविदा/१६७/१८
अहमदनगर दि. १५/१२/२०१८

आपण सादर केलेली नाला खोलीकरण त्रिभूवनवाडी ता पाथर्डी जि. अहमदनगर या कामाची ब-१ निविदा रक्कम रुपये (१६६५१९/-) अक्षरी रुपये एक लक्ष सहासष्ठ हजार पाचशे एकोणविस मात्र निविदा रक्कमेच्या ०.०० (टक्के) अंदाजपत्रक दराने मंजूर करण्यात आलेली आहे.

ग्रामपंचायत कौडगाव यांनी निविदा स्विकृतीचे सर्व कागद पत्रावर स्वाक्षरी केली आहे. सदरचे काम उपअभियंता जिल्हा परिषद ल पा/ग्रा पा पु/ सा बां उपविभाग पाथर्डी यांचे देखरेखी खाली व सुचनेप्रमाणे पुर्ण करावे. कंत्राटदाराने काम विहित मुदतीत पुर्ण करणंचे दृष्टिने बांधकामाचे बाबीचे सुयोग्य नियोजन करुन त्याचा सविस्तर एकत्रिक कार्यक्रम इकडे सादर करावा.

काम सुरु झालेची तारीख आदेशाचे दिनांकापासून समजणेत येईल. कामाची मुदत दि. ३१/०३/२०१९ राहील. विहित मुदतीत काम पुर्ण होईल याची दक्षता कंत्राटदाराने घ्यावयाची आहे. सदरचे काम निविदेमधील शर्ती व अटी नुसार पुर्ण करणे ही कंत्राटदाराची जबाबदारी आहे. तसेच कामाचा व कामावर काम करणा-या मजुरांचा विमा विमा संचनालय मुंबई येथे उतरवण्याची जबाबदारीही संबंधित कंत्राटदाराची राहील. कामाचे ठिकाणी कामाचे नाव, कंत्राटदाराचे नाव, कार्यारंभ आदेश दिनांक, कामाची किंमत, काम पुर्ण करावयाचा दिनांक या सर्वांचा स्पष्ट उल्लेख करणेत येऊन तसा माहिती फलक दर्शनी भागात लावण्यात यावा.काम वरील मुदतीत पुर्ण करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. ठेकेदारच्या देयकातुन कपात केलेली सुरक्षा अनामत रक्कम संबंधित आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण झाले शिवाय परत केली जाणार नाही.

शासन निर्णय : महाराष्ट्र शासन, जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र. जलशि-२०१५/प्र क्र११५/जल-७ मंत्रालय मुंबई दि. १३ मार्च २०१५ नुसार खालील अटी शर्ती नुसार कामे करण्यास बंधनकारक आहे.

१. डिजीटल फोटो काम सुरु होणेपूर्वी काम सुरु असतांना व काम पूर्ण झाले नंतर त्यांचे डिजीटल फोटो (GPS Tagged) काढून ज्यामध्ये कामाच्या स्थळाच्या अक्षांश/रेखांश नमुद असेल असे फोटो काढून ते जनतेच्या माहितीसाठी संकेतस्थळावर उपलब्ध करुन द्यावे.

२. कामाचा दोषमुक्त दायित्व (Deffect Liabilities) कालावधी दोन वर्ष राहील सदर कालावधीत कामामध्ये दोष निर्माण झाल्यास व दुरुस्त करण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदार व संस्थेची राहील.

३. अंतिम देयक अदा करतांना अंमलबजवायची कार्यपध्दती- पूर्ण करण्यात आलेल्या कामाचे अंतीम देयक संबंधित यंत्रणा (Agency) ला अदा करण्यापूर्वी अंमलबजावणी करणा-या यंत्रणेतील अधिका-याने पूर्ण केलेल्या कामाची तपशिलवार माहिती ग्रामसभेस अवगत करणे देखील आवश्यक आहे. असे करत असतांना या संदर्भात ग्रामस्थांकडून कोणत्याही स्वरुपाची तक्रार प्राप्त झाल्यास अंतिम देयक न देता त्याची संपूर्ण शहानिशा करुन आणि कामाची गुणवत्ता तपासून कामाचे अंतिम देयक अदा करण्याची कार्यपध्दती अवलंबवण्यात यावी.

४. शासन निर्णय क्र.निविदा-२०१४प्र.क्र.२६० पंरा-७दि.२७ मे.२०१५ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

५. शासन परिपत्रक क्र.२०१८ प्रक.१९८/बांध४/ दिनांक१२.१०.२०१८ नुसार कन्त्राटदारांनी कामगाराची कामगार कल्याण कारी मडळाकडील नोंदणी आसणे बंधनकारक आहे.

६. शासन परिपत्रक क्र परास-२०१५/प्र.क्र.३४६ बांध.३४६ बांध -३ दि. ५/१०/२०१८ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

७. न्युनतम दराच्या निविदा धारकांबरोबर करारानामा व इतर सर्व विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन कार्यारंभ आदेश दिल्यापसून सबळ करणाशिवाय एक महिन्याच्या आत काम सुरु केले नाही तर सदर कार्यरंभ आदेश आपोआप व्यपगत होईल त्यानंतर भाग घेतलेल्या इतर निविदाधारकापैकी आर्थिक तक्त्याच्या क्रमानुसार जो न्युनतम दरास काम करणेस तयार होईल अशा निविदाधारकांकडून नमूद काम पुर्ण करुन घेणेची विहित पध्दतीने कार्यवाही पुर्ण करणेत येइल

जि.प.लेखाशिर्ष संकेतांक तपशिलवार लेखाशिर्ष
मुख्य लेखाशिर्ष :- ४४०२-२७८१ जलयुक्त शिवार

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. 201812151506666 आहे.

जिल्हा जलसंधारण अधिकारी
जि.प.ल.पा.विभाग अहमदनगर

प्रति, ग्रामपंचायत कौडगाव पाथर्डी
प्रत - माहितीसाठी सविनय सादर
मा. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अहमदनगर
प्रत - उपअभियंता,पाथर्डी जि प ल पा/ ग्रा पा पु/ सा बां उपविभाग जि. अहमदनगर यांना माहिती व पुढील योग्यत्या कार्यवाहीसाठी

Scanned by CamScanner